दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०७ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## रुपाली चाकणकर आक्रमक, दीपाली सय्यद यांना खेचलं कोर्टात

**मुंबई :** नाशिकमधील वादग्रस्त भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्या काळ्या कारनाम्यांवर आधारित 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाची घोषणा झाली असून राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या चित्रपटावरून सुरू असलेला वाद आता अधिकच चिघळला आहे. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर चांगल्याच आक्रमक झाल्या आहेत.


### पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### वारकऱ्यांची मुंबई डबेवाले करणार भोजन व निवासाची व्यवस्था

**मुंबई :** खेड, मावळ, पिंपरी-चिंचवड आणि लोणावळा परिसरात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला मोठा पूर आला आहे. या पुराचा फटका संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदीत दाखल झालेल्या लाखो वारकऱ्यांना बसला असून, शहरातील अनेक भाग जलमय झाल्याने वारकऱ्यांच्या निवास, भोजन आणि इतर मूलभूत सुविधांवर परिणाम झाला आहे. पुराच्या पाण्यामुळे शासन आणि प्रशासनाने उभारलेल्या अनेक सुविधा बाधित झाल्या असून वारकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी वारकऱ्यांना सध्या आळंदी व देहूकडे येणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

### धर्मांतर प्रकरणातील संशयित निदा खानला जामीन

नाशिक : नाशिकमधील टीसीएस कंपनीत कार्यरत असलेल्या एका अविवाहित तरुणीवर अत्याचार तसेच जबरदस्तीने धर्मांतराचा प्रयत्न झाल्याच्या प्रकरणात नाशिकरोड अतिरिक्त सत्र न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपी निदा एजाज खान हिला सशर्त जामीन मंजूर करण्यात आला आहे.

आरोपी गर्भवती असून तिची प्रकृती गंभीर असल्याचा मुद्दा तिच्या वकिलांकडून न्यायालयात मांडण्यात आला होता. त्या पार्श्वभूमीवर मानवी दृष्टिकोन व आरोग्यस्थितीचा विचार करून न्यायालयाने हा जामीन दिल्याचे समजते.

दरम्यान, या गुन्ह्यातील सहआरोपी तौसिफ अत्तार याच्यावर विनयभंगाचा आरोप असल्याने त्यालाही जामीन मंजूर करण्यात आला आहे. मात्र, बलात्काराचा गंभीर आरोप असलेल्या मुख्य संशयित आरोपी दानिश शेख याचा जामीन अर्ज न्यायालयाने नामंजूर केला असून तो सध्या न्यायालयीन कोठडीतच राहणार आहे.

हे प्रकरण संवेदनशील असल्याने त्याचा तपास विशेष तपास पथकाकडे (SIT) सोपवण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १५०० पानांचे सविस्तर दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

### 'हाच माझा शेवटचा विश्वचषक!' : क्रिस्टियानो रोनाल्डो

**नवी दिल्ली :** जागतिक फुटबॉलमधील महान खेळाडूंपैकी एक असलेल्या क्रिस्टियानो रोनाल्डोने आपल्या कारकिर्दीबाबत मोठी घोषणा केली आहे. २०२६ चा फिफा विश्वचषक हा आपल्या कारकिर्दीतील शेवटचा विश्वचषक असेल, असे रोनाल्डोने स्पष्ट केले. स्पेनविरुद्धच्या महत्त्वपूर्ण 'राऊंड ऑफ १६' सामन्यापूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत त्याने ही भावनिक घोषणा केली. पाच वेळा बॅलन डी'ऑर विजेता असलेल्या रोनाल्डोने क्लब आणि आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये असंख्य विक्रम आपल्या नावावर केले आहेत. मात्र, अद्याप त्याच्या कारकिर्दीत फिफा विश्वचषक विजेतेपदाची भर पडलेली नाही. त्यामुळे २०२६ च्या स्पर्धेत पोर्तुगालला विश्वविजेते बनवण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो अखेरचा प्रयत्न करणार आहे.

सहा विश्वचषकांचा अविस्मरणीय प्रवास : २०२६ च्या स्पर्धेसह रोनाल्डोने तब्बल सहा फिफा विश्वचषकांमध्ये सहभाग नोंदवला आहे. २००६ मध्ये पहिल्यांदा विश्वचषक खेळणाऱ्या रोनाल्डोने त्यानंतर २०१०, २०१४, २०१८, २०२२ आणि आता २०२६ अशा प्रत्येक स्पर्धेत पोर्तुगालचे नेतृत्व केले. जवळपास दोन दशकांहून अधिक काळ आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या रोनाल्डोची ही कारकीर्द आधुनिक फुटबॉलमधील सर्वात यशस्वी प्रवासांपैकी एक मानली जाते.

## उघड्या डीपींचे 'मृत्यूचे जाळे'... दुर्घटनेनंतरच जागे होणार का महावितरण?


### शिवाजीनगरातील उघडी 11 केव्ही विद्युत डीपी बनली जीवघेणा धोका; पावसाळ्यात अपघाताची भीती, नागरिकांमध्ये संताप


हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात एका बाजूला वीज सुरक्षेबाबत जनजागृती केली जाते, तर दुसऱ्या बाजूला महावितरणच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांचा जीव अक्षरशः धोक्यात घातला जात असल्याचे चित्र शिवाजीनगर परिसरात पाहायला मिळत आहे. परिसरातील एका बोळात उभी असलेली ११ केव्ही विद्युत डीपी अनेक दिवसांपासून उघडी पडली असून, तिच्या आत उच्चदाबाच्या उघड्या तारा, गंजलेले पॅनेल आणि विस्कळीत विद्युत यंत्रणा स्पष्टपणे दिसत आहे. या धोकादायक डीपीकडे महावितरणने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

विशेष म्हणजे ही डीपी अशा ठिकाणी आहे, येथून रोज नागरिकांची ये-जा असते. परिसरातील लहान मुले याच भागात खेळतात. डीपीचे दरवाजे तुटलेले असून कोणालाही सहज आत हात घालता येईल, अशी अवस्था आहे. पावसाळ्यात डीपीभोवती पाणी साचल्यास किंवा उघड्या तारांचा संपर्क आल्यास क्षणात जीवघेणा अपघात होऊ शकतो. तरीही संबंधित विभागाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

प्रत्यक्ष पाहणीत डीपीभोवती कचऱ्याचा ढीग, उघड्या केबल्स आणि गंजलेले लोखंडी कपाट दिसून आले. अनेक ठिकाणी वायरचे



इन्सुलेशन निघालेले असून सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना दिसत नाहीत. डीपीभोवती संरक्षक जाळी नाही, इशारा फलक नाही आणि दरवाजा नाही. अशा अवस्थेतील ही डीपी म्हणजे नागरिकांसाठी अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनली आहे.

काही दिवसांपूर्वी पिसादेवी परिसरात महावितरणच्या डीपीमधून जमिनीत उतरलेल्या विद्युत प्रवाहाचा धक्का लागून एका मजुराचा जागीच मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतरही शहरातील धोकादायक डीपींची तपासणी किंवा दुरुस्ती करण्यात आलेली दिसत नाही. त्यातच शिवाजीनगरातील शिवशंकरनगर येथे खेळत असताना तीन चिमुरड्यांना ११ केव्ही विजेचा जोरदार शॉक बसल्याची घटना ताजी असतानाही महावितरणने कोणताही धडा घेतलेला नसल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. त्या दुर्घटनेत मुलांचे प्राण वाचले, मात्र त्यांच्या शरीरावर गंभीर भाजल्या गेल्या आणि त्यांच्या कुटुंबीयांवर मोठा मानसिक आघात झाला.

महावितरणच्या निष्काळजीपणामुळे अशा घटना वारंवार घडत असताना प्रशासन केवळ अपघातानंतर पंचनामे आणि चौकशीपुरतेच मर्यादित राहणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. शहरातील सर्व उघड्या डीपींचे तातडीने सर्वेक्षण करून त्यांना मजबूत दरवाजे, सुरक्षित कुलूप, संरक्षक जाळी आणि आवश्यक सूचना फलक लावावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## स्पर्धा परीक्षांमधील घोळाविरोधात भव्य आंदोलन; 12 जुलैपर्यंत निर्णय न झाल्यास तीव्र संघर्षाचा इशारा

### हाती तिरंगा, तोंडी घोषणा! पेपरफुटीविरोधात विद्यार्थ्यांचा ऐतिहासिक एल्गार; विभागीय आयुक्त कार्यालय दणाणले

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात सातत्याने समोर येत असलेल्या परीक्षांमधील सावळागोंधळ आणि पेपरफुटीच्या सत्रांमुळे स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संयमाचा अखेर बांध फुटला आहे. संतप्त झालेल्या हजारो विद्यार्थ्यांनी आज हातात तिरंगा ध्वज घेऊन छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयावर धडक दिली. "विद्यार्थ्यांच्या भविष्याशी चाललेला खेळ थांबवा", "पेपरफुटी रोखा", आणि "दोषींना कठोर शिक्षा करा" अशा गगनभेदी घोषणांनी आज सकाळी संपूर्ण विभागीय आयुक्त कार्यालय परिसर दणाणून गेला होता. महाराष्ट्र राज्य विद्यार्थी कृती समितीच्या वतीने आयोजित या ऐतिहासिक आंदोलनात

-> पान 2 वर



**"अभ्यास करणाऱ्यांचे पेपर अन् राजकारणात आमदार-खासदार फुटतात!"**

"राज्यात प्रामाणिकपणे दिवस-रात्र अभ्यास करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांचे पेपर फुटत आहेत. दुसरीकडे आमदार-खासदार फुटत आहेत; पण लोकप्रतिनिधी फुटण्यापेक्षा विद्यार्थ्यांचे पेपर फुटणे हे अधिक गंभीर आणि क्लेशदायक आहे. ज्याला सीबीएसई (CBSE) काय हे कळेना, टीईटीचा (TET) पेपर फुटलेला कळेना, असला शिक्षणमंत्री या राज्याला लाभला आहे, हे राज्याचे दुर्दैव आहे. आज प्रशासनाने आम्हाला आंदोलनासाठी स्टेज मिळू दिला नाही, पण लक्षात ठेवा, २०२९ ला फडणवीसांना ट्रॉलीवर उभा केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही! "

- दीपक केदार
राष्ट्रीय अध्यक्ष पँथर सेना

"राज्यातील विद्यार्थ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. या आंदोलनाची तीव्रता इतकी मोठी आहे की, विद्यार्थ्यांची ही आर्त हाक ऐकून मला थेट दिल्लीहून छत्रपती संभाजीनगरमध्ये यावे लागले. सरकारला आता विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य कराव्याच लागतील, अन्यथा हा संघर्ष थांबणार नाही."

अभिजीत दिपके (संस्थापक, कॉकरोच जनता पार्टी)

"सध्याच्या व्यवस्थेवर टीका करताना अत्यंत खेद होतो. या राज्यांत जुगाराचा 'मटका' कधी फुटत नाही, पण गरिबांच्या, शेतकऱ्यांच्या लेकरांचा 'पेपर' मात्र दरवेळी फुटतो! ही सिस्टीम पूर्णपणे सडली असून ती सुधारल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही."

रविराज साबळे पाटील

## इंद्रायणीला पूर; वारकऱ्यांनी आळंदीत न जाण्याचे प्रशासनाचे आवाहन



पुणे : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यानिमित्त आळंदीकडे निघालेल्या वारकरी आणि भाविकांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचे आवाहन केले आहे. मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर (Flood in Indrayani) आल्याने आळंदी शहरात जाणे सध्या सुरक्षित नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून (CMO) जारी करण्यात आलेल्या आवाहनात सांगण्यात आले आहे की, ज्या वारकरी आणि भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, त्यांनी ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित थांबावे. परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत आळंदीकडे जाण्याचे टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने वारकऱ्यांना आळंदीऐवजी पुणे शहरात होणाऱ्या वारीमध्ये सहभागी होण्याचा सल्ला दिला आहे. तसेच इंद्रायणी नदीपात्र, घाट परिसर आणि सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.



छत्रपती संभाजीनगर : माणसाचा चांगुलपणा समाज कधीच विसरत नसतो कळत नकळत आपल्या नेहमी च्या कामातुन तो व्यक्त होतो . सेवानिवृत शिक्षक विलास पाटील सर यांचा नुकताच रेल्वे प्रवासी संघटनेने सत्कार केला त्याप्रसंगीचे एका स्नेहीजनाचे हे गौरवोद्गार.

## राज्यात पावसाचा कहर! 17 NDRF आणि 6 SDRF पथके तैनात

### लोणावळ्यात तब्बल 670 मिमी पावसाची नोंद

**मुंबई :** राज्यात मुसळधार पावसाचा जोर कायम असून काही जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची परिस्थिती निर्माण झाली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज व्यक्त केल्याने राज्य प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सतर्क केली आहे. राज्यातील संवेदनशील भागांमध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (NDRF) 17 आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (SDRF) 6 पथकांची तैनाती करण्यात आली असून नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने केले आहे.

मान्सून काळातील संभाव्य आपत्तींचा सामना करण्यासाठी पालघर आणि नागपूर येथे प्रत्येकी दोन NDRF पथके, तर पुणे, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि धाराशिव येथे प्रत्येकी एक पथक तैनात करण्यात आले आहे. याशिवाय मुंबईत चार NDRF पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. SDRF ची सहा पथकेही धुळे, नागपूर, नांदेड आणि गडचिरोली येथे तैनात असून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सज्ज आहेत.

राज्यात लोणावळ्यात तब्बल 670 मिमी पाऊस झाला असून ताम्हिणी येथे 580 मिमी, अंबोना येथे 537 मिमी, जुहू विमानतळ परिसरात 325 मिमी, विभाग येथे 305 मिमी, माथेरान येथे 302 मिमी, कर्जत येथे 291.5 मिमी, निलशी येथे 275 मिमी, भिवपुरी येथे 266 मिमी, मुळशी येथे 230 मिमी, भाईंदर येथे 188.5 मिमी, पनवेल येथे 182.5 मिमी, तर मुंबईतील सांताक्रूझ येथे 151.2 मिमी आणि कुलाबा येथे 128 मिमी पावसाची नोंद झाली आहे.

### "शाल जोडे"




## शहरात पोलिसांचे 'कॉम्बिंग ऑपरेशन'; 11 गुन्हे दाखल, 17.46 लाखांचा मुद्देमाल जप्त

### चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दोन दिवस विशेष मोहीम; फरार आरोपी अटकेत, वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी पोलीस आयुक्त प्रविण पवार यांच्या आदेशानुसार ३ आणि ४ जुलै रोजी शहरातील सिडको, एमआयडीसी (एम. सिडको), मुकुंदवाडी आणि पुंडलिकनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. या कारवाईदरम्यान अवैध दारू व्यवसाय, फरार आरोपी, वाहन तपासणी, समन्स व वॉरंट बजावणी तसेच प्रतिबंधक कारवायांवर विशेष भर देण्यात आला.

३ जुलै रोजी सिडको व एम. सिडको पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सायंकाळी ७ ते रात्री ११ या वेळेत राबविण्यात आलेल्या मोहिमेत २ पोलीस निरीक्षक, २१ अधिकारी आणि १५५ पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. या कारवाईत अवैध मद्यविक्री, वाहतूक व साठा प्रकरणी ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून ९,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एका व्यक्तीवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली, तर दोन फरार आरोपींना अटक करण्यात आली. १४ रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. याशिवाय एक एनबीडब्ल्यू (NBW) वॉरंट, १० समन्स बजावण्यात आले. चार ठिकाणी नाकाबंदी करून १९४ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५८ वाहनांवर कारवाई करत ६५ हजार ७५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

४ जुलै रोजी पुंडलिकनगर व मुकुंदवाडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत झालेल्या कॉम्बिंग ऑपरेशनमध्ये २ पोलीस निरीक्षक, ८ अधिकारी आणि ९७ पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. या मोहिमेत अवैध मद्य व्यवसायाविरोधात ५ गुन्हे दाखल करून ६ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करून तब्बल १७ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाच हॉटेलांची तपासणी करण्यात आली.

या कारवाईत विविध कायद्यांनुसार सहा प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या. तीन फरार आरोपींना अटक करण्यात आली, तर १८ रेकॉर्डवरील गुन्हेगारांची पडताळणी करण्यात आली. तीन एनबीडब्ल्यू व नऊ बीडब्ल्यू (BW) वॉरंट तसेच २१ समन्स बजावण्यात आले. चार ठिकाणी नाकाबंदी करून २०० वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७६ वाहनांवर कारवाई करत ६१ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. शहरातील गुन्हेगारी, अवैध धंदे आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध अशा प्रकारच्या विशेष मोहिमा यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## निसर्गाचा रुद्र अवतार आणि प्रशासकीय सतर्कता

नाशिक जिल्ह्यात मुसळधार पावसाने घेतलेला तीव्र जोर आणि घाटमाथ्यासाठी जारी करण्यात आलेला रेड अलर्ट निसर्गाच्या वाढत्या आव्हानांची गंभीर जाणीव करून देणारा आहे. संभाव्य अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश परिस्थितीचा इशारा लक्षात घेऊन वनविभागाने नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि इगतपुरी वनहद्दीतील सर्व प्रमुख पर्यटनस्थळे पुढील आदेशापर्यंत पर्यटकांसाठी बंद करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि काळाची गरज बनलेला आहे. दरवर्षी पावसाळ्यात निसर्गाचे विहंगम रूप पाहण्यासाठी अंजनेरी, ब्रह्मगिरी, हरिहरगड, पहिने आणि दुगारवाडी यांसारख्या डोंगररांगा व धबधब्यांच्या ठिकाणी पर्यटकांची अलोट गर्दी होत असते. मात्र, यंदा हवामानाचा वाढता धोका आणि आपत्कालीन परिस्थिती पाहता प्रशासनाने नागरिकांच्या जिवाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. राज्यात गेल्या काही दिवसांत अतिवृष्टीमुळे दरडी कोसळणे, झाडे पडणे आणि इमारतींचे नुकसान होण्याच्या गंभीर घटना घडल्या आहेत. अशा परिस्थितीत डोंगराळ आणि घाट परिसरात पर्यटनाचा मोह ठेवणे म्हणजे स्वतःहून संकटाला आमंत्रण देण्यासारखे आहे. हवामान विभागाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या मध्यभागी अतिमुसळधार पाऊस आणि ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवल्यानंतर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा अलर्ट मोडवर आली आहे. पश्चिम वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना तातडीने आदेश देऊन पर्यटनस्थळे पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. धोकादायक भागात कोणत्याही परिस्थितीत पर्यटकांना प्रवेश दिला जाणार नाही, यासाठी स्थानिक पोलीस आणि संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांच्या माध्यमातून रस्त्यांवरच नाकेबंदी करून कडक अंमलबजावणी केली जात आहे, ही योग्य दिशा आहे. प्रशासकीय पातळीवर आपत्कालीन यंत्रणा सज्ज असली, तरी नागरिकांचे सहकार्य आणि आत्मपरीक्षण या लढ्यात सर्वात महत्त्वाचे ठरणार आहे. अनेकदा बंदी असूनही उत्साहाच्या भरात पर्यटक गुप्त मार्गांनी किंवा धोकादायक कड्यांवर जाण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे दुर्घटना घडतात. ढगफुटीसारख्या आपत्तीत निसर्गाला आव्हान देणे कोणालाही परवडणारे नाही. त्यामुळे नागरिकांनी आणि पर्यटकांनी केवळ प्रशासनाच्या सूचनांचे पालन न करता, हवामान सामान्य होईपर्यंत धबधबे आणि घाट परिसरात जाणे पूर्णपणे टाळले पाहिजे. निसर्गाचा आनंद जरूर घ्यावा, परंतु तो घेताना स्वतःची आणि कुटुंबीयांची सुरक्षितता धोक्यात येणार नाही, याचे भान प्रत्येकाने ठेवणे हीच या काळातील खरी सजगता ठरेल.

## बेवारस मृतदेह; ओळख पटविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.६(जिमाका)-येथील रेल्वेस्टेशनच्या फोर व्हिलर पार्किंगमध्ये दो.१ रोजी मध्यरात्रीनंतर १ वा. १५ मि. सुमारास अनोळखी उसम बेशुद्ध अवस्थेत आढळुन आला. त्यास घाटी रुग्णालयात दाखल केले असता त्यास मृत घोषीत करण्यात आले. मयत इसम हा अनोळखी असून त्याची ओळख पटविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलीस स्टेशनचे तपासी अंमलदार जी.एस. चेळेकर यांनी केले आहे. मयताचे वर्णनः वय अंदाजे ४५ वर्षे, रंग गोरा, नाक सरळ, डोळे काळे, केस काळे पांढरे, चेहरा लांबट, अंगात पॅण्ट शर्ट (पांढरी फुले असलेला शर्ट) वरील वर्णनाच्या इसमाबाबत काही माहिति कळाल्यास वेदांत नगर पोलीस स्टेशनच हवल्दार जी.एस. चेळेकर यांच्याशी ८६६८४७५४१२ अथवा ०२४०-२३५१३३३ वर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (जिमाका)- अध्यात्म, तत्वज्ञान, भक्ती, वेदान्ताचे गाढे अभ्यासक संत श्री गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी (सामान्य) श्रीमती संगिता राठोड यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.३ (जिमाका)- अध्यात्म, तत्वज्ञान, भक्ती, वेदान्ताचे गाढे अभ्यासक संत श्री गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी (सामान्य) श्रीमती संगिता राठोड यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षांमधील घोळाविरोधात भव्य आंदोलन; 12 जुलैपर्यंत निर्णय न झाल्यास तीव्र संघर्षाचा इशारा

पान 1 वरून ->

राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून हजारो तरुण-तरुणी आपल्या हक्कांसाठी भर पावसामध्ये रस्त्यावर उतरले होते. "सध्या सुरू असलेली पेपरफुटी ही अत्यंत गंभीर बाब असून यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. प्रत्येक परीक्षेनंतर पेपरफुटीची भीती विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत आहे. अनेक विद्यार्थी कर्ज काढून, नोकरी सोडून किंवा इतर गोष्टींचा त्याग करून स्पर्धा परीक्षांची अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तयारी करतात. मात्र, अशा पेपरफुटीमुळे त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर होत आहे. सरकारने आता तरी जागे व्हावे असे सांगितले. या भव्य आंदोलनात आमदार रोहित पवार, कॉकरोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके, प्रा. विठ्ठल कांगणे सर, प्रा. नितेश कराळे, रविकांत तुपकर, रविराज साबळे पाटील, दीपक केदार, संतोष मगर, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, माजी आमदार सुनील भुसारा, माजी आमदार नरेंद्र काळे, माजी आमदार संजयभाऊ वाकचौरे, पंकजनाना बोराडे, अतुल गावंडे, सिद्धू लोमटे, दीपक केदार यांच्यासह अनेक विद्यार्थी चळवळीतील नेते आणि हजारो युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर विभागीय आयुक्तांना मागण्यांचे सविस्तर निवेदन सुपूर्द करण्यात आले.

# मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळाची गरज; खासदार संदिपान भूमरे यांची जोरदार मागणी

### नांदेड येथील दक्षिण मध्य रेल्वेच्या वार्षिक आढावा बैठक



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**नांदेड :** दक्षिण मध्य रेल्वे विभागाच्या वार्षिक आढावा बैठकीत मराठवाड्याच्या रेल्वे विकासाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भूमरे यांनी मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे विभाग (रेल्वे मंडळ) स्थापन करण्याची जोरदार मागणी करत याबाबत केंद्र शासनाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या. या मागणीला बैठकीस उपस्थित मराठवाड्यातील सर्व खासदारांनीही पाठिंबा दिला.

भूमरे यांनी सांगितले की, सध्या छत्रपती संभाजीनगरसह मराठवाडा दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाअंतर्गत येत असल्याने स्थानिक गरजा, नवीन प्रकल्प आणि विकासकामांकडे अपेक्षित गतीने लक्ष दिले जात नाही. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत विलंब होत असून प्रवासी सुविधांवरही परिणाम होत आहे.

स्वतंत्र रेल्वे मंडळ स्थापन झाल्यास स्थानिक स्तरावर निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होईल, नवीन रेल्वेगाड्या, पायाभूत सुविधा, देखभाल आणि विकासकामांना चालना मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पर्यटनस्थळांना अधिक सक्षम रेल्वे जोडणी, दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉर (DMIC) परिसरातील उद्योगांना मालवाहतुकीची सुविधा, नवीन रेल्वे कार्यालये व देखभाल केंद्रांमुळे रोजगारनिर्मिती आणि मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला न्याय मिळेल, असा दावा त्यांनी केला.

बैठकीस खासदार अजित गोपछडे, शिवाजी काळगे, कल्याण काळे, रवींद्र चव्हाण, बळवंत वानखेडे, अशोक चव्हाण, संजय जाधव, नागेश आष्टीकर, संजय देशमुख, अनुप धोत्रे, बजरंग सोनावणे, रामराव वडकुते, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह दक्षिण मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळाचा प्रस्ताव आता केंद्र शासनाकडून कितपत गांभीर्याने घेतला जातो, याकडे संपूर्ण विभागाचे लक्ष लागले आहे.

# भद्रा मारुती ते पंढरपूर पायी दिंडी भक्तिमय वातावरणात रवाना, भद्रा मारुती संस्थान तर्फे वारकऱ्यांना भोजनासाठी ताटांचे वाटप

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी



**खुलताबाद :** आषाढी वारीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी खुलताबाद येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री भद्रा मारुती संस्थानच्या वतीने आयोजित पायी दिंडी आज मोठ्या भक्तिमय वातावरणात पंढरपूरकडे रवाना झाली. "ज्ञानोबा-तुकाराम" आणि "पुंडलिक वरदा हरी विठ्ठल"च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि हरिनामाच्या गजरात वारकरी विठुरायाच्या भेटीसाठी मार्गस्थ झाले.

दिंडी प्रस्थानापूर्वी श्री भद्रा मारुतीचे दर्शन घेऊन तसेच विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी दिंडीतील सर्व वारकऱ्यांचे स्वागत करून त्यांच्या सुखरूप व यशस्वी वारीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी श्री भद्रा मारुती संस्थानच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांना भोजनासाठी स्टीलच्या ताटांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे वारकऱ्यांनी स्वागत करत संस्थानचे आभार व्यक्त केले.

या प्रसंगी भद्रा मारुती संस्थानचे अध्यक्ष मिठू बारगळ, बाबासाहेब बारगळ, कचरू बारगळ, जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे,दिंडी चालक गजानन महाराज बारगळ, शेळके आबा, बाळकृष्ण लोढे, ज्ञानेश्वर बारगळ, कचरू बाबा गोळेगावकर,सौरभ कुलकर्णी, भागिनाथ मरकड, बंडू पाटील, किशोर महाराज, शिवाजी शिनगारे, सुरेश फुलारे ,यांच्यासह वारकरी, ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


आषाढी वारीची अनेक वर्षांची परंपरा जपत निघालेली ही पायी दिंडी मार्गातील विविध गावांमध्ये हरिनामाचा संदेश देत पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पोहोचणार आहे. भक्तिभाव, शिस्त आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम असलेल्या या दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.


# कृ उ बा समिती गंगाखेड व्यापारी संकुलाचे अनधिकृत बांधकाम, नगरपरिषदेने बजावली नोटीस

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** कृषी उत्पन्न बाजार समिती मोंढा परिसर मुख्य मार्केट यार्ड मध्ये उभारलेल्या शॉप क्रम गोडाऊन व फार्म ट्रेडर्स चे गाळे व व्यापारी संकुलातील अन्य गाळाचे बांधकाम विमा प्रमाणात केल्याचा ठपका ठेवत बांधकाम विनापरवाना असल्याचे अनधिकृत बांधकाम पाडण्यासंबंधी नगर परिषदेत प्रशासनाने सोमवार दिनांक 6 जुलै रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती सचिवव सभापती यांना नोटीस बजावल्याने एकच खळबळ उडाली आहे. अधिक माहिती अशी की गंगाखेड कृषी उत्पन्न बाजार समितीने मोंढा परिसरातील मार्केट यार्ड उभारलेले व्यापारी संकुलातील शॉप कम गोडाऊन तळमजला व पहिला माळावरील फार्म ट्रेडर्स गाड्यांचा जाहीर लिलाव बुधवार आठ जुलै रोजी ठेवल्याच्या प्रगटनाद्वारे जाहीर केले आहे महाराष्ट्र जनक्रांती सेनेचे रोहिदास लांडगे यांनी जिल्हा उपनिबंधक यांच्यासह नगर परिषदेकडे तक्रार केली असता व्यापारी संकुलातील गाड्यांचा जाहीर लिलावाच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेचे सहाय्यक स्वच्छता निरीक्षक व कार्यालयीन अधीक्षकानी बाजार समितीच्या मुख्य यार्डातील तीन गोडाऊन पाडून त्या जागी शाप कम गोडाऊन तळमजला व पहिला मजला बांधकाम करण्यात येत असल्या आपल्या ठिकाणी पाहणी करत कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयाच्या पश्चिम दक्षिण भागातील तळमजल्यावर सात कार्यालयात पश्चिम दक्षिण भागातील फार्म ट्रेडर्स पहिल्या मजल्यावर सात पूर्व उत्तर भागातील तळमजल्यावर शॉपकॉम चार व गोडाऊन एक पहिल्या मजल्यावर फार्मर स्टेटस पाच व मारुती मंदिर भागात शॉपकॉर्न गोडाऊन पहिल्या मजल्यावर फार्मर ट्रेडर्स पाच या अतिरिक्त उत्तरेकडील सात अधिकाऱ्यांचा बांधकामाला नगरपरिषदेकडून बांधकाम परवानगी न घेता बांधकाम केले असून हे बांधकाम अनधिकृत अहवाल सादर केले ने कृषी उत्पन्न बाजार समिती विनापरवाना केलेल्या बांधकाम पाडणे सोमवार ६ जुलै रोजी नगर परिषदेचे मुख्याधिकारी जयवंत सोनवणे यांनी गंगाखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव व सभापती यांना नोटीस बजावून सात दिवसाच्या आत आपली मालकी व ताब्यातील मालमत्त्यांचे संबंधित जागेच्या मालकीचा हक्काचा पुरावा आकर्षिक परवानगी एन ए व मंजूर लेआउट तसेच बांधकाम परवानगी नकाशासह अधिक कागदपत्रे कार्यान वेळेत नगरपरिषद कार्यालयात सादर करण्याची सूचित केले आहे या वेळेत कागदपत्रे सादर केले नाही तर आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला असून गंगाखेड कृषी उत्पन्न बाजार समितीने बांधलेल्या गाड्याचे नियोजित जाहीर लिलावाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने दिलेले या नोटीसिंमुळे व्यापारी संकुलातील गाळे घेण्यास इच्छुक असलेल्या व्यापाऱ्यात मोठी खळबळ उडाली आहे या घटनेकडे अनेक व्यापाराचे लक्ष लागले आहे. गंगाखेड कृषी उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड शासनाच्या सूचना व परवानगीनुसार जिल्हा उपनिबंधक तसेच पणन महासंघाचे मान्यता घेत सर्व परवानगी घेऊन व्यापारी संकुलातील गाळ्याचे बांधकाम केले असल्याचे तसेच नगर परिषदेने दिलेल्या नोटीस चे उत्तर वेळेवर देण्यात येणार असल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव भोसले यांनी सांगितले

# अजिंठा घाटातील पावसाच्या नाल्या गाळाने तुंबल्या





**फर्दापूर, दि. ५ :** छत्रपती संभाजीनगर–जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील अजिंठा घाटात पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या अनेक नाल्या गाळ, मुरूम व मातीमुळे तुंबल्या आहेत. तसेच घाटातील डोंगरकड्यावर अनेक ठिकाणी झाडे आणि दगड धोकादायकरीत्या लटकलेल्या अवस्थेत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

फर्दापूर परिसरात सध्या रिमझिम पाऊस सुरू असून, पावसाचा जोर वाढल्यास तुंबलेल्या नाल्यांमधील पाणी थेट महामार्गावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्यावर पाणी साचून नव्याने खड्डे पडण्याबरोबरच अपघातांचा धोका वाढणार असल्याची भीती वाहनचालकांनी व्यक्त केली आहे.

घाटातील नाल्यांची नियमित साफसफाई आणि डोंगरकड्यावरील धोकादायक झाडे व सैल झालेले दगड हटविण्याचे काम अद्याप झाले नसल्याने संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या कामांकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याची मागणी प्रवासी व वाहनचालकांकडून होत आहे.

पावसाचा जोर वाढण्यापूर्वी घाटातील सर्व नाल्यांची साफसफाई करून पाण्याचा निचरा सुरळीत करावा तसेच डोंगरकड्यावरील धोकादायक झाडे व दगड त्वरित हटवावेत, अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा वाहनचालकांनी दिला आहे.

# शेन्द्रा एमआयडीसीतील प्लॅटिनम स्क्वेअर परिसरात 300 वृक्षांचे रोपण



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शेन्द्रा एमआयडीसी येथील प्लॅटिनम स्क्वेअर परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रसिद्ध मराठी अभिनेते, पर्यावरणप्रेमी व सह्याद्री देवराईचे संस्थापक अध्यक्ष सयाजी शिंदे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे कार्यक्रमाचे उद्घाटन करून अधिकाधिक वृक्ष लागवड व संगोपन करण्याचे आवाहन केले. पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

हा उपक्रम छत्रपती संभाजीराजे वृक्ष बँक, एकता परिषद, कृष्णाज् नोबल फाउंडेशन आणि लोकमतचे श्रवण शिवांगी यांच्या संयुक्त पुढाकारातून आयोजित करण्यात आला. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत अर्जुन, कडुलिंब, गावरान आंबा, मोहगनी, पिंपळ, पारिजात, जांभूळ, बकुळ व वड आदी सुमारे ३०० वृक्षांची लागवड केली.

वृक्षारोपणासाठी लागणारी रोपे कृष्णाज् नोबल फाउंडेशनचे श्रीकांत थोरात यांनी उपलब्ध करून दिली, तर वृक्ष संरक्षणासाठी जाळ्या व बांबूची व्यवस्था छत्रपती संभाजीराजे वृक्ष बँकेचे पोपटराव रसाळ आणि संतोष ठाकूर यांनी केली. उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था एकता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अभिमन्यू उबाळे (मामा) यांनी केली. यावेळी पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन करण्याचा सामूहिक संकल्प करण्यात आला.

# डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या 125व्या जयंतीनिमित्त जालन्यात विविध कार्यक्रम

### बंद उद्यान नागरिकांसाठी पुन्हा खुले



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना :** भारतीय जनसंघाचे संस्थापक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने जालना शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त कार्यकर्ता संमेलन, वृक्षारोपण तसेच अनेक वर्षांपासून बंद असलेले डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी उद्यान नागरिकांसाठी पुन्हा खुले करण्यात आले.

उद्यान पुन्हा सुरू झाल्याने उपस्थित नागरिक व भाजप कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. डॉ. मुखर्जी यांच्या जयंतीदिनीच त्यांच्या नावाचे उद्यान सर्वसामान्यांसाठी खुले होणे ही जालनेकरांसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश सचिव राहुल लोणीकर, महापौर वंदना मगरे, मनपा आयुक्त अंजली शर्मा, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, रामेश्वर पाटील भांदरगे, युवानेते अक्षय गोरंट्याल, सभापती अशोक पांगारकर, संगीता गोरंट्याल, संध्या देठे, धनराज काबलिये यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

त्यानंतर झालेल्या कार्यकर्ता संमेलनात डॉ. मुखर्जी यांच्या राष्ट्रहिताच्या विचारांचा आढावा घेण्यात आला. "एक देश, एक संविधान" या संकल्पनेची मांडणी करताना त्यांच्या संघर्षाचा उल्लेख करण्यात आला. जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० आणि ३५अ हटविण्याचा निर्णय हा डॉ. मुखर्जी यांच्या विचारांना वाहिलेली खरी आदरांजली असल्याचे वक्त्यांनी सांगितले. कार्यक्रमास नगरसेवक, पदाधिकारी आणि भाजप कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मराठवाड्यातील सेवा संस्थांचा 11 जुलैला स्नेहमेळावा; विकासासाठी एकत्र येणार सामाजिक संघटना

### ग्रामीण विकास क्षेत्रातील संस्थांना सहभागाचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या सेवा संस्थांमध्ये परस्पर परिचय, संवाद आणि सहकार्याची नवी दिशा निर्माण करण्याच्या उद्देशाने ग्रामायण प्रतिष्ठानच्या वतीने 'मराठवाडा सेवा संस्था स्नेहमेळावा' आयोजित करण्यात आला आहे. हा स्नेहमेळावा ११ जुलै (शनिवार) रोजी सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, ओंकार शैक्षणिक संकुल, बजाज हॉस्पिटलच्या मागे, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

सन २०१२ पासून महाराष्ट्रभर सामाजिक व ग्रामीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या ग्रामायण प्रतिष्ठानने या मेळाव्याची जबाबदारी स्वीकारली आहे. मेळाव्यात मराठवाड्यातील निवडक सेवा संस्थांच्या कार्याचा परिचय करून देण्यात येणार असून, स्वयंसेवी संस्थांसमोरील सध्याची आव्हाने, त्यावरील उपाययोजना, तसेच सेवा कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक असलेल्या समन्वय आणि सहकार्यावर विविध सत्रांमध्ये सखोल चर्चा होणार आहे.

याशिवाय, विविध संस्थांमध्ये परस्पर सहकार्याची क्षेत्रे, संसाधनांची देवाणघेवाण आणि सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या समन्वयावरही विचारमंथन करण्यात येणार आहे.

या स्नेहमेळाव्यात मराठवाड्यातील सर्व सेवा संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प्रत्येक संस्थेतून दोन प्रतिनिधींना सहभागी होता येणार असून, सहभाग पूर्णपणे निःशुल्क असल्याची माहिती शिरीष कुलकर्णी यांनी दिली.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## महापालिकेत संत गुलाबराव महाराज जयंतीनिमित्त अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या वतीने संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी आदरपूर्वक अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी नगरसेवक सुरेंद्र कुलकर्णी, आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य लेखा परीक्षक शिवाजी नाईकवाडे, कार्यकारी अभियंता अनिल तनपुरे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. उज्वला भामरे, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे, इंझमाम उल हक यांच्यासह महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात संत गुलाबराव महाराज यांच्या अध्यात्म, समाजप्रबोधन आणि मानवकल्याणासाठीच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचा आदर्श समाजाने स्वीकारण्याची गरज व्यक्त करत जयंतीनिमित्त विनम्र श्रद्धांजली अर्पण केली.

## 'बालविवाह मुक्त, बाल भिक्षेकरी मुक्त व नशामुक्त शहरासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे: जिल्हाधिकारी विनय गौडा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यामध्ये 'बालविवाह मुक्त छत्रपती संभाजीनगर', 'नशामुक्त छत्रपती संभाजीनगर' आणि 'बाल भिक्षेकरी विरोधी' अभियान अधिक प्रभावीपणे आणि गतिमानतेने राबविण्याची अत्यंत गरज आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केवळ एकाच विभागावर विसंबून न राहता सर्व शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि संबंधित विभागांनी परस्परांशी उत्तम समन्वय ठेवून मिशन मोडवर काम करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत. महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध समित्या, विंग्स आणि शासकीय योजनांचा विस्तृत त्रैमासिक आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. ३) एका उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत जिल्ह्यातील महिला व बालकांच्या सुरक्षिततेचा आणि कल्याणाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीच्या सुरुवातीला जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे यांनी महिला व बाल विकास विभागांतर्गत चालणाऱ्या विविध योजनांच्या प्रगतीचा आणि समित्यांच्या कामकाजाचा सविस्तर अहवाल सादर केला. यामध्ये प्रामुख्याने मिशन वात्सल्य, मिशन शक्ती, जिल्हा संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन-१०९८, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, विशेष बाल पोलीस पथक, वन स्टॉप सेंटर, महिला हेल्पलाईन, शक्ती सदन, पॉक्सो आणि अँटी ह्युमन ट्रॅफिकिंग अशा अत्यंत महत्त्वाच्या यंत्रणांच्या त्रैमासिक कामकाजाचा समावेश होता. हा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी उपस्थित यंत्रणेला निर्देश दिले की, महिला आणि बालकांच्या संरक्षणाशी संबंधित असलेली सर्व प्रकरणे अत्यंत संवेदनशीलतेने हाताळली पाहिजेत आणि त्यामध्ये कोणतीही दिरंगाई न करता ती तातडीने निकाली काढण्यात यावीत. त्याचप्रमाणे शासनाच्या प्रत्येक कल्याणकारी योजनेचा थेट लाभ शेवटच्या घटकातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर प्रशासनाने विशेष भर दिला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या महत्त्वपूर्ण बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मिन्नू, महिला व बालविकास विभागाचे विभागीय उपआयुक्त कृष्णा राठोड, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ, परिविक्षा अधिकारी रविंद्र भिमनवार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महादेव डोंगर यांच्यासह कल्पना डोईफोडे, वर्षा शेळके, जय शिरसाट, आम्रपाली बोर्डे आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**बालगृहांची वैद्यकीय तपासणी करून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे जिल्हा शल्यचिकित्सकांना निर्देश**

बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी जिल्ह्यात चाईल्ड हेल्पलाईन-१०९८ चा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार करण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या, जेणेकरून संकटात सापडलेल्या कोणत्याही बालकाला त्वरित मदत मिळवून देणे शक्य होईल. याशिवाय, जिल्ह्यातील बालगृहे, निरीक्षणगृहे, शिशुगृहे आणि इतर संबंधित संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या आरोग्याचा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतला. जिल्ह्यातील सर्व बालगृहांची वैद्यकीय पथकाद्वारे तातडीने तपासणी करण्यात यावी आणि त्याचा सविस्तर अहवाल पुढील १५ दिवसांच्या आत जिल्हा शल्यचिकित्सकांनी प्रशासनाकडे सादर करावा, असे थेट आदेश त्यांनी दिले.

**ग्राम बाल संरक्षण समित्यांचे पुनर्गठन न केल्यास ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर होणार कारवाई - मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मिन्नू यांचे संकेत**

या बैठकीत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मिन्नू यांनी ग्रामीण व शहरी भागातील बाल संरक्षणाच्या मुद्द्यावरून कडक भूमिका घेतली. ग्रामीण भागातील ग्रामपंचायत स्तरावरील ग्राम बाल संरक्षण समित्या आणि शहरी भागातील वॉर्ड बाल संरक्षण समित्या तातडीने पुनर्गठित करण्याचे आदेश त्यांनी दिले. ज्या ग्रामपंचायतींमध्ये या समित्यांचे पुनर्गठन विहित मुदतीत पूर्ण होणार नाही आणि त्याचे अहवाल सादर केले जाणार नाहीत, अशा ठिकाणी संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर थेट प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दम मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू यांनी यावेळी दिला.

## महामंडळाच्या योजनेतंर्गत व्यवसायासाठी कर्ज प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन

**परभणी:** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ जिल्हा कार्यालय, परभणीकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजने अंतर्गत ५० लाभार्थी व बिजभांडवल योजने अंतर्गत ५५ लाभार्थींचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. या दोन योजना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबविल्या जातात. या योजनांच्या लाभासाठी चांभार समाजात अंतर्भाव असणाऱ्या चांभार, ढोर, मोची, होलार या समाजातील अर्जदारांकडुन विविध व्यवसायांसाठी कर्ज प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

तरी सदर योजनांसाठी कर्ज प्रस्ताव महामंडळाच्या विहित नमुन्यातील अर्ज दि. ०७ जुलै ते दि. 7 ऑगस्ट २०२६ पर्यंत (सार्वजनिक सुट्टी वगळता) कार्यालयीन वेळेत, जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी या ठिकाणी स्विकारले जातील. परभणी जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील चांभार, ढोर, मोची, होलार, या समाजतील बेरोजगार युवक-युवती, होतकरु, गरजु अर्जदारांनी या योजनेचा जास्त लाभ घ्यावा, असे महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक अरुण राऊत यांनी केले आहे.

सदर योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांनी या पूर्वी महामंडळाच्या कुठल्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा तसेच अर्जदाराने महामंडळाच्या नियमाप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन कर्ज प्रस्ताव तीन प्रतीत स्वतः अर्जदाराने मुळ कागदपत्रासह उपस्थित राहुन दाखल करावेत. त्रयस्थ/मध्यस्थामार्फत कर्ज प्रकरणे स्विकारण्यात येणार नाहीत. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे - जातीचा दाखला (सक्षम अधिका-याकडुन घेतलेला असावा), महिलांसाठी जातीचा दाखला किंवा नावाबाबत शपथपत्र सादर करणे, सबंधित अर्जदाराचा सिबील स्कोअर कमीत कमी पाचशे असणे आवश्यक आहे (प्रत जोडणे), अर्जदाराच्या कुटूंबाचा उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार यांच्याकडुन घेतलेला असावा), पासपोर्ट साईज फोटोच्या तीन प्रती जोडाव्या, अर्जदाराचा शैक्षणिक दाखला, राशन कार्ड झेरॉक्स प्रत, आधार कार्ड, मतदान कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक प्रत्येकी तीन प्रती जोडाव्या, व्यवसायाचे दरपत्रक (कोटेशन जी एस.टी. चे), व्यवसाय ज्याठिकाणी करावयाचा आहे त्या जागेची भाडेपावती/करारपत्रक किंवा मालकी हक्काचा पुरावा (नमुना न ८) लाईट बिल, चालु वर्षातील टॅक्स पावती (या पैकी एक), उदमआधार, शॉप अॅक्ट लायसन किंवा ग्रा पं/ न.पा./मनपा यांचे व्यवसाय करण्यासाठीचे नाहरकत प्रमाणपत्र, बिजभांडवल योजनेसाठी प्रकल्प अहवाल रिपोर्ट (सि.ए यांचा), बिजभांडवल योजनेसाठी एक सक्षम जामिनदार असणे आवश्यक आहे. (शेती धारक, किंवा नौकरीधारक किंवा प्रॉपर्टीधारक), वाहनासाठी लायसन्स, परवाने, बॅच आवश्यक, व्यवसाय सबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला, यापुर्वी अनुदान न घेतल्या बाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे, अर्जदाराचे वय हे १८ ते ५० च्या दरम्यान असावे, सबंधीत अर्जदाराचे आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, हे शैक्षणिक दाखल्यावर असलेल्या जन्म तारखेप्रमाणे असावे.

## गोमय शेण गोमूत्र बनवलेल्या धूप अगरबत्ती साहित्य आषाढी वारी दिंड्या मध्ये खरेदी करण्याचे आव्हान -नितीन जाधव गोगलगावकर

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी




**परभणी:**गौरक्षक सेना -वीर वारकरी सेवा संघ परभणी-कै.छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट परभणी च्या वतीने महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या गो संवाद यात्रेमध्ये सर्व गोशाळेचे उत्पन्न शेणापासून गौर्यापासून बनवलेले उत्पादन वाढले पाहिजे व विक्री खरेदी जास्त प्रमाणात झाली पाहिजे अशा आव्हानाला प्रतिसाद म्हणून त्याचा प्रचार प्रसार सोशल मीडियाच्या माध्यमातून होण्यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून करण्याचा मानस परभणी जिल्ह्यातील गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी आषाढी वारी जाणाऱ्या दिंड्यांना मध्ये राज्य माता गोमाता नंदी महाराज यांच्या गोमय शेण गोमूत्र पासून बनवलेले उत्पादन अगरबत्ती धूप वेगवेगळे वस्तू अशा अनेक प्रकारच्या वस्तू तयार करून एक प्रत्येक दिंडीमध्ये आषाढी वारी असो किंवा प्रत्येक आपल्या गावातून जाणाऱ्या दिंड्या असो प्रत्येक मंदिराच्या वेगवेगळ्या धार्मिक स्थळाच्या ठिकाणी एक स्टॉल लावून त्याची विक्री करावी नाहीतर त्याची एक आपण आपल्या माध्यमातून विक्री करण्यासाठी खरेदी विक्री करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन द्या व त्यांना गो शाळेतले गौर्या गोमूत्र अगरबत्ती धूप पंती अशा अनेक प्रकारचे साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे तेव्हा खरेदी करणारे किंवा विक्रेते उद्योजक हे आपल्याकडून जास्त गोशाळेला उत्पन्न होऊ शकते आणि उद्योजक बना अशी वारीमध्ये जनजागृती गोमय जनजागृती अभियान राबवण्यात आले अकोला येथील प्रसिद्ध उत्पादन गो खरेदी विक्रेते उद्योजक दीपक जोशी यांनी यांच्या गोमातेच्या शेण गोमूत्रा पासून बनवलेल्या वेगवेगळ्या अगरबत्ती गौर्या धूप अनेक इतर वस्तू आयुर्वेदिक हे स्वतः बनवून वेगवेगळ्या ठिकाणी गावोगावी गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यामध्ये गोमातेचा प्रसार प्रचार व गोमातेच्या संरक्षणासाठी जनजागृती करतात तर प्रत्येक गोशाळेच्या संचालक गोशाळेचे अध्यक्ष गोशाळेचे सर्व गोशाळा चालकांनी गोरक्षकांनी गोपालकांनी आपण आपल्या गोशाळेतले उत्पादन वाढवा आणि उद्योजक त्याची विकृती विक्रेत्याकडे करा तुमच्याजवळ तुमच्या ठिकाणीच बाजारपेठ उपलब्ध आहे फक्त उत्पादन वाढवा एकच छंद गोमातेच्या शेण पासून गोमूत्रापासून उत्पादन वाढवणे अशी आव्हान गोमय उत्पादन विक्रेते खरेदी जनजागृती अभियान परभणी शहरात मार्केट कमिटी दिंडी राबवण्यात आली परभणी याप्रसंगी गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांचा गो उत्पादन विक्रेते उद्योजक दीपक भाऊ जोशी यांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला अशी माहिती गौरक्षक सेना मराठवाड्याचे अध्यक्ष गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर राष्टीय गोसेवक सचिदानंद गुरु यांनी पत्रका द्वारे माहिती दिली.

## मोबाईल दाखवण्याचा नादात पाच वर्षीय चिमुकली अत्याचार; गुन्हा दाखल

हिंदू प्रकाश वार्तापत्र प्रतिनिधी.

**परभणी:** घरासमोर खेळणाऱ्या एका छोट्या चिमुकलीला नराधमाने मोबाईल दाखवण्याच्या बहाऱ्याने घरात बोलून छोट्याशा पाच वर्षे चिमुकलीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना पूर्णा तालुक्यातील खेडेगावात घडली. सदरील खेडेगाव चुडावा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने पाच जुलै रोजी चुडावा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदण्यात आला.

या घटनेचा अधिक माहिती अशी की पीडित मुलीच्या आईने याबाबत तक्रार दिली आहे शुक्रवार दिनांक 3 जुलै रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घरासमोर खेळत असलेल्या चिमुकलीला बोलवून मोबाईल दाखवण्याच्या बहाण्याने घरात बोलवून त्या चिमुरड्या बालिकेवर अत्याचार केला ही घटना चुडावा पोलीस ठाणे हद्दीत एका गावामध्ये घडली नातेवाईकांनी पीडित चिमुकल्या बालिकेच्या आईला धीर दिल्यानंतर पिढीतेच्या आईनी शिवराज लोखंडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिकारी करत आहेत.

## पाथरी येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी व डीजेपी एज्युकेशनल कॅम्पस, पोहेटाकळी व श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर, शाखा शिवाजी नगर, पाथरी, त्र्यंबकेश्वर (नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने आज (दि. 06) रोजी पाथरी येथे रोजगार मेळावा संपन्न झाला.

रोजगार मेळाव्याचे उद्‌घाटन डीजेपी एज्युकेशनल कॅम्पस चे रजिस्टार डॉ. आर.डी इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांच्यासह सचिन माने, रमेश पाटील, डॉ. शायिदा देशमुख, श्री. गव्हाणे, श्री. कोल्हे, विकास डफूरे उपस्थित होते.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी रोजगार मेळाव्यास उपस्थित उमेदवारांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. इंगोले यांनी उपस्थित उमेदवारांना रोजगार प्राप्त करुन आयुष्यात यशस्वी कसे व्हावे या बददल मार्गदर्शन केले.

या मेळाव्यात दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर तसेच इत्यादी शैक्षणीक पात्रता उमेदवारांसाठी विविध पदांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. बँक ऑफिसर, बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, क्षेत्र अधिकारी, नर्सिंग, वॉर्डबॉय, रिसेप्शनिस्ट, सेल्स रिप्रेझेंटेटिव्ह, अॅग्रीकल्चर ऑफिसर, ट्रेनी ऑपरेटर, विमा सल्लागार, विमा सखी, लाईफ मित्र आदी पदांसाठी निवड प्रक्रिया पार पडली.

मेळाव्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व जिल्हा उद्योग केंद्र यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहून उमेदवारांना विविध योजनांची माहिती दिली. या रोजगार मेळाव्यात 116 पुरुष व 82 महिला असे एकूण 190 उमेदवारांनी सहभाग नोंदविला असून त्यापैकी 22 पुरुष, 15 महिला असे एकूण 37 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. मेळावा यशस्वी करण्यासाठी संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## सहकार सप्ताहानिमित्त जिंतूरमध्ये सहकार दिंडी उत्साहात




**जिंतूर | प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सहकार सप्ताहानिमित्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, जिंतूर यांच्या कार्यालयातर्फे स्थानिक सहकारी संस्थांच्या सहकार्याने रविवारी (दि. ५ जुलै २०२६) सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले.

सकाळी ११ वाजता सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, जिंतूर कार्यालयापासून सुरू झालेली दिंडी नरसिंह चौक, मुख्य चौक, कापड बाजार, पोलीस स्टेशन, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे येलदरी रोडपर्यंत काढण्यात आली. यावेळी सहाय्यक निबंधक बी. एस. नांदापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सहकार रथ आकर्षक बॅनरने सजविण्यात आला होता.

दिंडीत श्री बी. एस. नांदापूरकर, यु. डी. घुगे, आत्माराम राठोड, कनकुटे यांच्यासह सुंदरलाल नागरी सहकारी बँकेचे अधिकारी-कर्मचारी, परभणी जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक डॉ. प्रकाश आकोशे, अर्थपूर्ती नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर देशपांडे, संचालक रवी कुमार पेशकर, कृष्णकुमार वट्टमवार, व्यवस्थापक मनोज चकोते, कपिल अंभोरे, अशोक बड, चंद्रभागा नागरी पतसंस्थेचे सीईओ वामन रणखांब, संजीवनी नागरी सहकारी पतसंस्थेचे अधिकारी- पदाधिकारी, जिंतूर तालुक्यातील गटसचिव, विविध सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी तसेच सहकार क्षेत्रातील अनेक अधिकारी व पदाधिकारी सहभागी झाले होते.

समारोपप्रसंगी सहाय्यक निबंधक बी. एस. नांदापूरकर यांनी महाराष्ट्रातील सहकार चळवळीचा इतिहास, सहकाराचे महत्त्व तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

## विमानतळ परिसरात लेझर, बीम लाईट्स वापरावर बंदी

छत्रपती संभाजीनगर, दि.६(जिमाका)- पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात विमानतळाच्या आजुबाजुच्या परिसरात असणारे फार्म हाउस, मंगल कार्यालय येथील विवाह सोहळा तसेच अन्य सामाजिक कार्यक्रमामध्ये लेझर लाईटस, बीम लाईटसच्या वापरावर दि.६ जुलै ते ३ सप्टेंबर २०२६ पर्यंतच्या कालावधीसाठी बंदी घालण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १६३ (१) व (३) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, पोलीस आयुक्तालय हद्दीतील सर्व फार्म हाऊस, मंगल कार्यालय, विवाह सोहळा, सामाजिक कार्यक्रम इ. च्या आयोजक, मालक यांनी लेझर लाईट्स, बीम लाईट्स याचा वापर करु नये. कारण अशा वापर केल्यामुळे पायलटच्या दृष्यात अडथळा निर्माण होऊन लँडीग व टेकऑफ करण्यापूर्वी लक्ष विचलित होऊन दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या आदेशाचे उल्लघंन करणाऱ्यावर भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ अन्वये व प्रचलित कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल व तो शिक्षेस पात्र राहील,असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

## फळपिक विमा योजनेसाठी अर्ज करण्यास 14 जुलैपर्यंत मुदतवाढ

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** पुर्नरचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना (मृग बहार) सन २०२६-२७ अंतर्गत संत्रा, द्राक्ष, पेरू, लिंबू, हळद, मोसंबी व चिकू या अधिसूचित पिकांसाठी पिक विमा भरण्याची अंतिम मुदत संपली होती. मात्र, पिक विमा नोंदणीचे पोर्टल विलंबाने सुरू झाल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र शासनाने या पिकांसाठी अर्ज करण्यास दि. १४ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मुदतवाढीचा लाभ कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकरी घेऊ शकतात. संबंधित शेतकऱ्यांनी विहित मुदतीत पिक विमा नोंदणी पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, दौलत चव्हाण यांनी केले आहे.

## महारक्तदान शिबिरात जिंतूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; 422 रक्तदात्यांचे रक्तदान



**जिंतूर / तालुका प्रतिनिधी :** विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने, लोकमत ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक तथा लोकमतचे संस्थापक स्वर्गीय जवाहरलालजी दर्डा यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त येथील नगरेश्वर मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या महारक्तदान शिबिराला जिंतूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सलग सहाव्या वर्षी झालेल्या या सामाजिक उपक्रमात तब्बल ४२२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. विशेष म्हणजे, १०० हून अधिक महिलांनी रक्तदान करून उल्लेखनीय सहभाग नोंदविला.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी सुंदरलाल सावजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष मुकुंद सावजी कळमकर होते. उपविभागीय महसूल अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले. यावेळी लोकमतचे संपादक राजेश निस्ताने, सहाय्यक सरव्यवस्थापक रमेश तावडे, नगराध्यक्ष प्रताप देशमुख, पोलीस निरीक्षक नामदेवराव रेड्डी, ज्येष्ठ विधिज्ञ अशोक सोनी, नायब तहसीलदार प्रशांत राखे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव, जिल्हा रुग्णालय रक्तपेढी प्रमुख डॉ. मनिषा राठोड, डॉ. क्षीरसागर, डॉ. दिपा परिहार, दिलीप देशपांडे, रमेश दरगड, मोहसिन पठाण, विधिज्ञ तथा नगरसेवक गोपाळ रोकडे, दत्ता कटारे, मुन्ना कुरेशी, शेख अथर, प्रदीप चौधरी, पंचायत समिती सदस्य बालाजी सांगळे, गजानन वट्टमवार, मनोज राजोतिया, विधिज्ञ मनोज सारडा आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत चाललेल्या शिबिरात जिल्हा शासकीय रुग्णालय, परभणी येथील रक्तपेढीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रक्तदात्यांना उत्कृष्ट सेवा दिली. युवकांसह महिलांचा मोठा सहभाग आणि उत्साह हे यंदाच्या शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. मान्यवरांचे रक्तदान जिल्हा परिषद सदस्य कृष्णकांत देशमुख, पोलीस निरीक्षक नामदेवराव रेड्डी, बीड जिल्हा सहाय्यक अभियोगता विधिज्ञ योगेश सरोदे, नगरसेवक दत्ता कटारे, गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, प्राचार्य कैलास मुटकुळे, औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष धर्मचंद अच्छा, प्रा. नारायण शिंदे, प्रा. पांडुरंग निळे, प्रा. सुरेश पारवे, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शिवप्रसाद सानप, प्रा.बाळू बुधवंत, गजानन वराड, संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष अभिजित देशमुख सह पत्नी यांच्यासह अनेक मान्यवरांनी रक्तदान केले. तर परिवारासह रक्तदान डॉ.योगेश दहिफळे, पंकज तोष्णीवाल, डॉ. शैलेश मंत्री, प्रा. बाळू बुधवंत, तेजल शहा, भास्कर काळे, सचिन चिद्रवार यांच्यासह अनेक कुटुंबांनी एकत्रित रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. मान्यवरांच्या सदिच्छा भेटीत वाशिमचे शिक्षणाधिकारी प्रा. विठ्ठल भुसारे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. देवराव कऱ्हाळे, भगवान वटाणे, अजय चौधरी, प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे, माजी नगराध्यक्ष तथा गटनेते सचिन गोरे, किरण वट्टमवार, केशव बुधवंत, डॉ. जी. जे. वाघमारे, डॉ. दिनेश बोराळकर, विधिज्ञ विनोद राठोड, मनिषा केंद्रे, शिवराम ढोणे, नामदेव पोटे, सुनील तोष्णीवाल आदींनी शिबिराला भेट देऊन आयोजकांचे अभिनंदन केले. रक्तदान शिबिराच्या प्रचार-प्रसारासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी प्रफुल्ल साबू यांनी विशेष सहकार्य केले. तसेच विविध शाळांच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी जनजागृती मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

यशस्वीतेसाठी सर्वांचे मोलाचे योगदान व शिबिर यशस्वी करण्यासाठी मंचक जगताप, भागवत चव्हाण, सचिन रायपत्रीवार, संदीप माहूरकर, शंतनु कुलकर्णी, दिलीप देवकर, चंद्रकांत गवळी, गुलाबराव शिंदे, संतोष चौधरी, शेख नूर, राम रेघाटे, सुधीर शहाणे, सुभाष मस्के, रणधीर शोभणे, सचिन देवकर, गणेश कुरे, सुदर्शन अच्छा, पुरुषोत्तम पोरवाल, घनश्याम जेठलिया, सुनील वट्टमवार, आलोक साबू, गजानन खैरीकर, मनीषा वाघमारे, जयश्री देशपांडे, शैला बंगाळे यांच्यासह व्हॉईस ऑफ मीडिया, जिंतूर तालुका प्रेस क्लब, योग परिवार, ज्ञानोपासक परिवार, शब्द सह्याद्री, राजस्थानी युवक मंडळ, आर्य वैश्य युवक मंडळ आणि विविध सामाजिक संस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

### जाहिर प्रगटन

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-142

दिनांक 18-05-2026

अर्जदार ०:- सुभाष धोंडू मोकासे रा.पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय पिशोर ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय :-जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ऍड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या आईचे मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा आई सखुबाई धोंडू मोकासे चा मृत्यू दिनांक 10-07-2011 रोजी पिशोर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या आई चा मृत्यू दिनांक 10-07-2011 रोजी पिशोर ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा आई सखुबाई धोंडू मोकासे यांचा मृत्यू दिनांक 10-07-2011 रोजी पिशोर ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 01-07-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 10-07-2011 रोजी पिशोर ता. कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../05/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# लोकशाही दिनी 43 तक्रारी अर्ज दाखल; जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** प्रशासकीय कामांमधील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. याच पार्श्वभूमीवर, आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय लोकशाही दिन उत्साहात पार पडला. या लोकशाही दिनामध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी विविध प्रशासकीय विभागांशी संबंधित एकूण ४३ तक्रारी अर्ज दाखल केले आहेत. आज दाखल झालेल्या एकूण अर्जांपैकी सर्वाधिक तक्रारी या इतर सामान्य स्वरूपाच्या निवेदनांच्या माध्यमातून समोर आल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आजच्या लोकशाही दिनात आलेल्या एकूण ४३ अर्जांचा विभागवार तपशील नागरिकांच्या थेट प्रशासनाशी संबंधित असलेल्या जिल्हा परिषद विभागाकडे एकूण ४ तक्रारी अर्ज दाखल झाले. तर जमिनीचे वाद, अतिक्रमण आणि इतर महसूल कामांशी संबंधित असलेल्या महसूल विभागाकडे ७ तक्रारी अर्ज प्राप्त झाले आहेत. यासोबतच, कार्यकारी अभियंता नांदूर मध्यमेश्वर पाटबंधारे विभागाकडे २ अर्ज दाखल करण्यात आले असून, इतर विविध विषयांवरील ३० साधी निवेदने नागरिकांकडून प्रशासनाला सादर करण्यात आली आहे. या लोकशाही दिनात प्राप्त झालेल्या सर्व तक्रारी अर्जांची संबंधित विभागांनी गांभीर्याने दखल घेऊन त्यावर तात्काळ आणि नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी हा लोकशाही दिन अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

# दरोड्याचा कट उधळला; 5 लाखांच्या मुद्देमालासह स्कॉर्पिओ जप्त, तीन गजाआड

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** बिडकीन DMIC परिसरामध्ये दरोडा टाकण्याच्या पूर्वतयारीमध्ये असलेल्या एका अट्टल गुन्हेगारांच्या टोळीचा बिडकीन पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना रंगेहात अटक केली असून, अंधाराचा फायदा घेऊन दोन आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ गाडी, महागडे मोबाईल आणि दरोड्यासाठी लागणारे साहित्य असा एकूण ५ लाख २० हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ३ जुलै रात्री बिडकीन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील हे आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांसह बिडकीन DMIC परिसरात पेट्रोलिंग करत होते. ४ जुलै रोजी पहाटे १.४५ वाजताच्या सुमारास ते निलजगाव रोडवर आले असता, त्यांना गुप्त बातमीदाराकडून एक अत्यंत महत्त्वाची माहिती मिळाली. बिडकीन DMIC परिसरातील सेक्टर क्रमांक १९, शिवनाई शिवार भागात एका पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीत पाच संशयास्पद इसम दरोडा टाकण्याच्या तयारीत फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. माहितीचे गांभीर्य ओळखून पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील आणि त्यांच्या अंमलदारांनी तातडीने दोन पंचांना सोबत घेतले आणि पहाटे २.३० वाजता सेक्टर १९ मधील मुख्य रोडवर सापळा रचला. काही वेळातच पोलिसांना बातमीदाराने सांगितलेली पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी येताना दिसली. पोलिसांनी तत्परतेने गाडीला थांबण्याचा इशारा केला, मात्र पोलिसांना पाहताच स्कॉर्पिओ चालकाने गाडीचा वेग वाढवून ती भरधाव वेगात पुढे पळवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी कोणतीही वेळ न घालवता शासकीय वाहनाने पाठलाग करून स्कॉर्पिओ गाडीला आडवे पाडले आणि ती थांबवली. गाडी थांबताच त्यातील दोन इसम अंधाराचा फायदा घेऊन शेतात पळून गेले, परंतु पोलिसांनी गाडीतील इतर तिघांना जागीच घेरून ताब्यात घेतले. पकडण्यात आलेले तिन्ही आरोपी हे अजवा नगर, वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांची कसून अंगझडती घेतली असता दरोड्याच्या पूर्वतयारीचे साहित्य आणि मुद्देमाल मिळून आला. गाडीचा चालक रईस शेख शहीर (वय ३२ वर्षे) याच्या अंगझडतीत १०,००० रुपये किमतीचा विवो V40 कंपनीचा मोबाईल, गुन्ह्यात वापरलेली ५,००,००० रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी (क्रमांक MH-41-C-8005) आणि १०० रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची दोरी आढळून आली. दुसरा आरोपी अमोल काशीनाथ खरात (वय ३० वर्षे) याच्याकडे ५० रुपयांचा छोटा काळसर रंगाचा कटर आणि ५० रुपयांचा हिरव्या रंगाचा स्क्रू ड्रायव्हर सापडला. तर तिसरा आरोपी रईस शेख युनूस (वय ३२ वर्षे) याच्या अंगझडतीमध्ये १०,००० रुपये किमतीचा विवो V40e कंपनीचा मोबाईल, ५०० रुपये किमतीचा एक निळसर रंगाचा लोखंडी कटर आणि ४० रुपये किमतीचे दोन हिरव्या रंगाचे हेक्झा ब्लेड जप्त करण्यात आले. पोलिसांनी हा सर्व ५,२०,८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेले आरोपी सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. आरोपी अमोल काशीनाथ खरात याच्यावर यापूर्वी वाळूज, एमआयडीसी वाळूज आणि मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात वाहन चोरी, दरोड्याची तयारी, जबरी चोरी आणि बेकायदेशीर हत्यार बाळगल्याप्रकरणी तब्बल ७ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच चालक रईस शेख शहीर याच्यावर २०१७ मध्ये एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल आहे.

नवीन भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अटक केलेल्या तीन आरोपींसह पळून गेलेल्या दोन फरार आरोपींविरुद्ध बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हासुधार क्रमांक ४४१/२०२६ नुसार नवीन कायद्याच्या कलम ३१० (४), ३१० (५) भारतीय न्याय संहिता (BNS) सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनजितसिंग सेना करत आहेत. सदरची उल्लेखनीय आणि धडक कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी (पैठण उपविभाग) श्री. सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिडकीन पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक जगन्नाथ उबाळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल संजीवन कदम, अमोल मगर, पोलीस नाईक पवन चव्हाण, पोलीस अंमलदार योगेश वाघमोडे आणि स्वप्नील दिलवाले यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# पालखीत भक्तदर्शनाच्या धुंदीत तर चोर चोरी करण्याचा नादात

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी आषाढी वारी निमित्त गजानन महाराजांची पालखी परभणीत येत असते तसेच रविवार 5 जुलै रोजी परभणीतील नवा मोंढा परिसरात गजानन महाराजांच्या पालखीचे व गुलाब महाराज पालखीचे आगमन झाले या पालखी मधील भक्तांचे रोकडेश्वर हनुमान मंदिर तर्फे व्यापारी महासंघाच्या वतीने च्या वतीने अन्नदान भाविकांना पावसापासून विविध वस्तू वाटप करण्यात आले तसेच महाकाल अन्नछत्र मंडळातर्फे अन्नदानाचे वाटप करण्यात आले या ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली याच गर्दीचा फायदा घेत पोलिसांच्याचोख बंदोबस्त असतानाही चोरट्याने भाविकाच्या दागिन्यावर डल्ला मारला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून विलास मस्के यांनी दिलेल्या फिर्यादीत सांगितले आहे. अधिक माहिती अशाकी रविवार पाच जुलै रोजी दुपारी साडेचार च्या सुमारास नवा मोंढा परिसरात मार्केट कमिटी यार्ड येथे गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांची मोठी झुंबड उडाली होती याच गरजेचा फायदा घेत पोलिसाचा चौक बंदोबस्त असताना सुद्धा ही एका महिलेच्या गळ्यातील नव्वद हजार रुपये किमतीची सोन्याची चैन लंपास करण्यात आली ही महिला दर्शन घेऊन घरी गेल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे समजले त्यांना मार्केट यार्ड मध्ये येऊन चैन शोधत असताना त्याच ठिकाणी त्यांना अश्विनी नितेश भावसार व त्यांच्या गळ्यातील बारा हजार रुपयाची किमतीचे मंगळसूत्र चोरीला गेल्याचे समजले त्याचबरोबर राणी संदीप वाघमारे यांच्या गळ्यातून 21 हजार रुपये किमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र चोरीस गेल्याचे कळविले याप्रकरणी कोतवाली पोलिसात अनोळखी चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी हे करत आहेत.

# अजिंठा, मुखपाठ, पिंपळदरी परिसरात पावसाची दडी; शेतकरी चिंतेत



**अजिंठा प्रतिनिधी/ सय्यद जमिरोद्दीन :** राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावून नद्या-नाले तुडुंब भरले असताना अजिंठा परिसर मात्र अद्यापही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे. सुरुवातीला झालेल्या तुरळक पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीची तयारी केली होती. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने पेरणीची कामे खोळंबली असून शेतकरी चिंतेत सापडला आहे.

कापूस, सोयाबीन, मका, बाजरी, तूर यांसारख्या खरीप पिकांची पेरणी योग्य वेळी होणे आवश्यक असते. परंतु पुरेसा पाऊस नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अजूनही पेरणी सुरू केलेली नाही. ज्या शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या पावसावर विश्वास ठेवून पेरणी केली, त्यांच्या शेतातील बियाण्यांची उगवण धोक्यात आली असून दुबार पेरणीचे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

बियाणे, खते, मशागतीचा वाढता खर्च आणि त्यात पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत. पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी होत चालला असून पिकांच्या वाढीवर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. अनेक शेतकरी दररोज आकाशाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहत आहेत.

हवामान विभागाने काही भागांत पावसाचा अंदाज वर्तवला असला तरी अजिंठा परिसरात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीप हंगाम धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढत आहे.

शासनाने परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन पावसाअभावी नुकसान होणाऱ्या शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत, पीकविमा दाव्यांची तातडीने अंमलबजावणी आणि कृषी विभागामार्फत योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# एक लिंक महादेव मंदिरातील दानपेटीवर चोरांचा डल्ला लाखो रुपये घेऊन चोर फरार



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** परभणी तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावरील सिंगणापूर फाटा येथील एकलिंग महादेव मंदिर प्रसिद्ध असून नेहमीच खूप मोठी गर्दी असते हो या महामार्ग वर भक्तांची एने जाने चालूच असते असेच मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने मंदिराचे दरवाजाचे कुलूप तोडून मंदिरात प्रवेश करून दानपेटी फोडून त्यातील रोकड व दागिने लंपास केल्याची घटना येथे घडली. या चोरीत लाखो रुपयाचा आवाज चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे घटनेबाबत अधिक माहिती अशी रविवारी मध्यरात्री रात्री दीड ते दोनच्या सुमारास मंदिराचे कुलूप तोडून करून मंदिरात प्रवेश केला. व मंदिरातील दानपेटी फोडून वर्षभर भावी भक्ताने केलेली देणगी दानपेटी जमा होती चोरट्याने दानपेटीतील नोटा बॅगेत भरलेल्या तर एक दोन दोन पाच आणि दहा रुपयाची नाणी घटना स्थळीच टाकून फरार झाले हे संपूर्ण घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून या फुटेज मध्ये चोरट्याने चेहऱ्यावर रुमाल बांधल्याचे स्पष्ट दिसून येत आहेत त्यांच्या हालचाली स्पष्टपणे रेकॉर्ड झालेले असून यापुढेच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. या घटनेची माहिती मिळतात सायक पोलीस निरीक्षक जी जी सोनेत पोलीस उपनिरीक्षक निखिल पवार, ज्ञानेश्वर घुगे, विठ्ठल कुंडगीर बळीराम करवर,तसेच ठसे तज्ञाच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला या प्रकरणी पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

# जैन टॅगतर्फे विद्यार्थ्यांसाठी आज मोफत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे आणि शिक्षणासोबत मनोरंजनाचा सुंदर संगम घडवून आणण्याच्या उद्देशाने जैन टॅगतर्फे आज दोन शाळांमध्ये मोफत जादूच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत नवजीवन स्कूल येथे सकाळी १०.३० वाजता तर पी. यू. जैन स्कूल येथे दुपारी २.३० वाजता आकर्षक जादूच्या प्रयोगांचे सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ शेकडो विद्यार्थ्यांना मिळणार असून, मनोरंजनासोबत त्यांना प्रेरणादायी आणि आनंददायी अनुभवही मिळणार आहे. यावेळी जैन टॅगच्या अध्यक्षा सौ. जयश्री लोहाडे म्हणाल्या, "मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच आमच्यासाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे. शिक्षणासोबत आनंद, सर्जनशीलता आणि सकारात्मक विचारांची जोड मिळावी, या हेतूने हा उपक्रम आयोजित केला आहे." या उपक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन रचना पहाडे, कीर्ती पाटनी, मिताली काला, सपना पाटनी, सारिका बडजाते आणि दिपाली पाडे यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. समाजहितासाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्याचा जैन टॅगचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेतर्फे समाजोपयोगी, शैक्षणिक आणि संस्कारक्षम उपक्रम सातत्याने राबविले जात असून, भविष्यातही विद्यार्थी, महिला आणि समाजाच्या हितासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# ९० वर्षीय आज्जीला दुर्मिळ आजारातून नवे जीवन; घाटीत 'मॉर्गग्नी हर्निया'वर यशस्वी शस्त्रक्रिया

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** वयाच्या नव्वदाव्या वर्षी दुर्मिळ आणि जीवघेण्या ठरू शकणाऱ्या आजाराशी झुंज देणाऱ्या एका वृद्ध महिलेला घाटी रुग्णालयातील डॉक्टरांनी यशस्वी शस्त्रक्रियेद्वारे नवजीवन दिले आहे. अत्यंत दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या 'मॉर्गग्नी हर्निया' या आजारामुळे आतड्यांचा अडथळा निर्माण झालेल्या या रुग्णावर करण्यात आलेली शस्त्रक्रिया वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

तीव्र पोटदुखी आणि शौचास न होण्याच्या तक्रारींमुळे ही महिला घाटी रुग्णालयात दाखल झाली होती. तपासणीनंतर तिच्या डायाफ्राममध्ये (श्वसनपटल) जन्मजात दोष असल्याचे स्पष्ट झाले. या दोषामुळे मोठ्या आतड्याचा ट्रान्सव्हर्स कोलन आणि ग्रेटर ओमेंटमचा काही भाग छातीच्या पोकळीत सरकल्याने आतड्यांचा अडथळा निर्माण झाला होता. शस्त्रक्रियेदरम्यान आतड्याचा भाग सुरक्षित असल्याचे आढळले. मात्र रक्तपुरवठा खंडित झाल्याने ग्रेटर ओमेंटमचा काही भाग निकामी झाला होता. डॉक्टरांनी तो भाग काढून टाकत संबंधित अवयव पूर्वस्थितीत आणले आणि डायाफ्राममधील दोषाची यशस्वी दुरुस्ती केली.

ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख डॉ. सरोजिनी जाधव यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. डॉ. अरेफ, डॉ. आदित्य कोंडपल्ले, डॉ. अमोल पाठक यांनी शस्त्रक्रिया केली, तर बधिरीकरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. गायत्री तडवळकर यांच्या नेतृत्वाखाली डॉ. किरण चव्हाण आणि डॉ. सिमरन सुरजमल यांनी भूलतज्ज्ञ म्हणून जबाबदारी सांभाळली. ऑपरेशन थिएटरमधील परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनीही मोलाचे योगदान दिले.

वैद्यकीय तज्ज्ञांच्या माहितीनुसार, मॉर्गग्नी हर्निया हा डायाफ्राम हर्नियाचा अत्यंत दुर्मिळ प्रकार असून सर्व प्रकरणांपैकी केवळ २ ते ५ टक्के रुग्णांमध्ये तो आढळतो. विशेष म्हणजे, ८० वर्षांहून अधिक वयाच्या रुग्णामध्ये आतड्यांचा अडथळा निर्माण करणारे असे प्रकरण अत्यंत विरळ मानले जाते. त्यामुळे घाटीत पार पडलेली ही शस्त्रक्रिया वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय यश मानली जात आहे.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती समाधानकारक असून तिला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. या यशस्वी उपचारामुळे घाटी रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची कौशल्यपूर्ण वैद्यकीय सेवा आणि दुर्मिळ, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया हाताळण्याची क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# खरीप हंगाम 2026-27 ज्वारी, बाजरी, मका, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी पीकस्पर्धा जाहीर

**छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (विमाका) :** राज्यातील विविध पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पीकस्पर्धा सन २०२६-२७ जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव होणार असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ इतर शेतकऱ्यांनाही मिळणार आहे. खरीप हंगाम २०२६ अंतर्गत ज्वारी, बाजरी, मका, तुर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या पिकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. मुग व उडीद पिकांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६, तर इतर सर्व पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना प्रति पीक रु. ३००, तर आदिवासी गटासाठी रु. १५० प्रवेश शुल्क निश्चित करण्यात आले आहे. अधिकाधिक शेतकऱ्यांनी या पीकस्पर्धेत सहभागी व्हावे. तसेच अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर सुनील वानखेडे यांनी केले आहे.

# सेवा करारावर नियुक्ती पाणीपुरवठा योजना मातीस मिळवतील -जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरासाठी असलेली नविन पाणी पुरवठा योजने बाबत प्रशासनाने दिलेल्या आदेशाविरुद्ध वागुन आणि एवढेच काय तर कंत्राटदार जे. व्ही. पी. आर हे सातत्याने प्रशासनाच्या सुचना गांभीर्याने घेत नाहीत. त्यात सेवा निवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती म्हणजे स्वः हाताने हा प्रकल्प मातीस मिळवतील असे स्पष्ट मत जेष्ठ जलअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.

मुळात ज्यांच्या नियुक्तीचा डाव आखल्या जात आहेत, त्या सगळ्यांना प्रशासनाने या ना त्या कारणाने विभागीय चौकशीत पाणी पुरवठा उपक्रमात दोषी असल्याचे अहवाल स्पष्ट सांगत असतांना त्यांचा परत सेवेत घेण्याचा डाव कोणासाठी व कशासाठी आखला जात आहे ? या मागे कोणाचा दबाव आहे काय ? हा प्रश्न असुन या सर्व बाबी प्रशासनाने गांभीर्याने लक्षात घेणे गरजेचे असुन दखल घेतली नाही तर आम्हाला या बाबत रितसर शासना कडे दाद मागावी लागणार असुन मनपा मध्येच कार्यरत असणाऱ्या सेवा निवृत्त पाणी पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्या बाबतची जाहिरात मनपा प्रशासनाने तात्काळ जनहितार्थ रद्द करावी अशी सुद्धा मागणी त्यांनी केली आहे.

वास्तवीक पाहता समस्त शहर वासियांना कंत्राटदार यांचे सह पीएमसी व इतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासनिक अधिकाऱ्यांना मुर्ख बनवत आहेत. असे प्रतिपादन उच्च न्यायालया समोर जनहीत याचीके द्वारे जनतेची बाजु मांडणारे जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रतिपादन केले असुन कॉफर डॅमचा विषय घ्या,अथवा पाईप लाईन अंथरणे,जागा निवडणे, सर्ज टँक,पाण्याच्या शहरभरात उभ्या करावयाच्या ५२ पेक्षा जास्त टाक्यांची जागा असे अनेक तांत्रिक विषय मनपा आणि शासनाने अजूनही विचारात घेतले तर खुप गतिमान स्थिती होऊन किंवा हैड्रोलीक टेस्टिंग शिवाय देयके अदा करू नये अशी बाब असो किंवा पी एम सी म्हणजे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्ट असुन नसल्या सारखी असुन करोडो रुपयांची देयके जमा करण्या शिवाय काही एक काम करीत नसुन अशी निष्क्रीय यंत्रणा कशासाठी पोसल्या जात आहेत ? ही मनिषा कोणाची आहे ?

असा परखड सवाल शासना समोर सातत्याने जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी खुप पूर्वीच उपस्थित केलेला असुन घडत असलेल्या सर्व बाबी म्हणजे शहर वासियांना पाण्यापासुन वेठीस धरण्याचा प्रकार असुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे स्वतः राज्यातील इतर पाणी पुरवठा प्रकल्पात पीएमसी म्हणुन कार्यरत इथे मात्र इथे नव्याने पी एम सी नेमला असुन ही उधळपट्टी कशा साठी ? बोलता बोलता तीन हजार कोटी प्रकल्प किंमत ओलांडणाऱ्या आणि त्या पेक्षा मोठ्या असलेल्या प्रकल्पास" यशच अपयश " मिळवुन देईल असे अनेक वेळा जेष्ठ जल अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले असुन उदाहरण द्यावयाचे झाल्यास जालना अंबड पाणी पुरवठा योजनेच्या पाईप लाईनला मजीप्रा म्हणजे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आत मधून अस्तरीकरण केले नव्हते लोकांच्या "पाणी द्या पाणी द्या " या घाईमुळे ते तसेच राहून गेले आणि तीन वर्षानंतर जल वाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे. घाई करूनही छत्रपती संभाजी नगर शहराला पाणी भेटत नाही हे विशेष. या घाईच्या नादामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण भविष्यात उद्भव विहिरी समोरील संपूर्ण बंधारा तोडणार नाही, वास्तविक पाहता तो बंधारा तोडने अत्यंत आवश्यक आहे. कारण की ते तात्पुरते बांधकाम असते. पाण्याच्या घाईमुळे मातीच्या बंधाऱ्या याशिवाय सिमेंटच्या पाईल टाकून अतिरिक्त बंधारा मजीप्रा ने बांधला आणि महानगरपालिके च्या बोकांडी तो जास्तीचा खर्च पडलेला आहे. त्या बंधाऱ्या पुढे विहिरीत पाणी येण्यासाठी चॅनल देखील करावयाचा आहे. त्यापूर्वीच घाई घाईमुळे सायफन पद्धतीने पाणी घेतले. आता ती पद्धत देखील दोन दिवस चालली आणि बंद पडली. पुन्हा त्या सायफन पद्धतीचा खर्च वाया गेला. त्यामुळे तरंगते पंप टाकून पाणी घेण्याचा प्रयत्न आहे. म्हणजे सगळं " ट्रायल अँड एरर " म्हणजेच शेखचिल्ली सारखी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची गत झाली आहे.

**आता पहा ना कंत्राटदार आणि :** संबधित महाराष्ट्र प्राधीकरण सामाजीक बांधिलकी अजीबात लक्षात घेत नसुन या प्रकल्पात पेच निर्माण करीत असल्याचे आणि त्यात भरीस भर म्हणजे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित नियुक्ती करण्याची प्रसिद्ध केलेली जाहीरात अंत्यन्त अयोग्य असुन प्रशासनाने ही जाहीरात जनहितार्थ तात्काळ परत घ्यावी अशी महत्वाची जनहितार्थ मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर केली आहे.आणि हे सेवानिवृत्त विवक्षित पद्धतीने महानगर पालिकेत आले तर त्यांनी पाणी पुरवठ्या मध्ये किती काळ आणि काय सेवा केली त हे देखील गृहीत धरणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी प्रदर्शित केले.विवक्षित पद्धतीने येणारे हे अभियंते महिन्याला ८० ते ९०हजार पगार महानगर पालिके कडून घेतील आणि महानगर पालिकेचा कुठलाही आर्थिक फायदा न होता महानगर पालिका पर्यायाने नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागणार आहे हे निश्चित.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911